# <u>निशाणी क्रमांक ७६ वरील आदेश</u>

(सुनिता वाळुंजकर विरूध्द किसन दळवी व इतर)

**१.** वादीच्या वतीने प्रस्तुत अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस प्रस्तावित प्रतिवादी यांना पटलावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मयत प्रतिवादी क्र. १ च्या विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व त्यावर प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-ब यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-अ व १-क यांच्याविरुद्ध प्रस्तुत अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

**३.** वादीच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. एच. टी. काशिद व प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-ब यांच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. एच. एन. डोके यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मुळ प्रतिवादी क्र. १ किसन माणिकराव दळवी हे दि. २८.०४.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. तथापी, सदर मयताचे कायदेशीर वारसांना मुदतीमध्ये पटलावर घेण्यात आलेले नाही. त्यानंतर, दि. २५.०९.२०१९ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादीस मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांची माहिती मुदतीत उपलब्ध न झाल्याने मयताचे कायदेशीर वारस विहित मुदतीमध्ये पटलावर घेता आले नाहीत.

**५.** प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुद्ध निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे निश्चीतपणे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस या नात्याने प्रस्तावित प्रतिवादींचे दावा मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध दडले असल्याचे दिसून येते. प्रस्तावित प्रतिवादी क्र. १-ब याने सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतलेली आहे. तथापी, दाव्याचे स्वरुप विचारात घेता आणि दावा गुणदोषावर अंतीमतः निर्गत करण्याच्या दृष्टीने मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारसांना प्रस्तुत दाव्याच्या प्रतिवादीपणात समाविष्ट करणे

न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

**६.** जरी, मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारसांना प्रस्तुत दाव्यामध्ये वारस म्हणून समाविष्ट करण्यास उशीर झालेला असला तरी, न्यायाच्या दृष्टीने वादीवर खर्च लादून मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या कायदेशीर वारसांना प्रस्तुत दाव्याच्या प्रतिवादीपणात समाविष्ट करुन दावा पुढे चालविण्याची संधी देणे नैसर्गीक न्यायतत्वानुसार योग्य व उचीत होईल. सबब, सर्व बाबींचा सारासार विचार करता प्रस्तुत अर्ज वादीवर खर्च लादून मंजूर करणे न्यायोचीत होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज नि. क्र. ७६ खर्च म्हणून प्रस्तावित प्रतिवादी क्र. १-ब यास रक्कम रु. ४००/- देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या कायदेशीर वारसांना पटलावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

सही/-

(रजनिकांत शे.जगताप)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः २३/०१/२०२४.